महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotiskill@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/५८२/२०२३-२४ दि.२७.०२.२०२४

**(UPSC मराठी माध्यम)**

## -:परिपत्रक:-

**विषय: संघ लोकसेवा आयोग (UPSC) मराठी माध्यम २०२३-२४ परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता वाढलेल्या जांगानुसार चौथी प्रतिक्षा यादीबाबत.**

महाज्योतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग (UPSC) मराठी माध्यम २०२३-२४ परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता निवड झालेल्या विद्यार्थ्यांची प्रारूप निवड यादी तसेच पहिली, दुसरी व तिसरी प्रतिक्षा यादी यापूर्वी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तथापि निवड यादी व प्रतिक्षा यादीतील काही विद्यार्थी रुजू न झाल्यामुळे अश्या विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात आलेले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी प्रशिक्षणाचे माध्यम निवडू शकले नाही अश्या विद्यार्थ्यांना दि.२१/०२/२०२४ ते दि.२२/०२/२०२४ रोजी रात्री ११.०० पर्यंत प्रशिक्षणाचे माध्यम निवडण्याकरिता पुन्हा लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी दिलेल्या पर्यायानुसार वाढीव जागांकरिता विद्यार्थ्यांची चौथी प्रतिक्षा यादी यासह प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**निवड झालेल्या चौथ्या प्रतिक्षायादी मधील ज्या विद्यार्थ्यांना दिल्ली येथील श्रीराम आय.ए. एस मध्ये इंग्रजी माध्यमातून प्रशिक्षण हवे असल्यास अश्या विद्यार्थ्यांनी तत्काळ महाज्योतीच्या mayur.mahajyotingp@gmail.com या ई-मेल आयडी वर आज रात्री ११.०० पर्यंत अर्ज पाठवावे.**

चौथ्या प्रतिक्षा यादीनुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या प्रशिक्षण केंद्रावर दि. २८.०२.२०२४ ते दि. ०४.०३.२०२४ या कालावधीपर्यंत रुजू व्हावे चौथ्या प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात प्रशिक्षण केंद्रावर हजर राहून दिलेल्या कालावधीत प्रवेश न घेतल्यास अश्या विद्यार्थ्यांची निवड रद्द करून विद्यार्थ्यांची पाचवी प्रतिक्षा यादी लावून विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

(स्वा)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन
व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर